निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
मंगळवार
१७ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५२ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे


## संक्षिप्त

### छत्रपती संभाजीनगर ग्रामीण भागात 'मनाई आदेश' लागू; २८ फेब्रुवारीपर्यंत निर्बंध

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने मोठे पाऊल उचलले आहे. आगामी काळातील विविध कार्यक्रम आणि संभाव्य गर्दी लक्षात घेता, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) आणि ३७ (३) अन्वये संपूर्ण ग्रामीण परिसरात मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.

अपर जिल्हादंडाधिकारी जनार्दन विधाते यांनी हे आदेश निर्गमित केले असून, हे निर्बंध २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अमलात राहतील असे स्पष्ट करण्यात आले आहे.

काय आहेत मुख्य निर्बंध?

या आदेशानुसार, ग्रामीण भागात खालील गोष्टींवर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे:

शस्त्र बाळगण्यास बंदी: लाठ्या-काठ्या, तलवारी, भाले, बंदुका, सुरे किंवा शरीरास इजा पोहचवू शकतील अशी कोणतीही शस्त्रे सोबत बाळगणे गुन्हा ठरेल.

प्रक्षोभक भाषणे व घोषणा: कोणत्याही व्यक्तीचा किंवा समुदायाचा अपमान होईल अशी प्रक्षोभक भाषणे करणे, गाणी म्हणणे किंवा घोषणाबाजी करण्यावर बंदी असेल.

प्रतीकात्मक पुतळ्यांचे दहन: सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही व्यक्तीच्या किंवा चिन्हाच्या पुतळ्याचे दहन करण्यास सक्त मनाई आहे.

जमावबंदी: पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना विनापरवाना एकत्र जमण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हे आदेश केवळ शांतता राखण्याच्या उद्देशाने लागू करण्यात आले आहेत. जर कोणीही या नियमांचे उल्लंघन करताना आढळल्यास, त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदींनुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

हे आदेश सरकारी कर्तव्य बजावत असलेल्या कर्मचाऱ्यांना, अंत्यविधीसाठी जमलेल्या नागरिकांना आणि लग्नसमारंभातील मिरवणुकींना (पूर्वपरवानगी असल्यास) लागू नसतील.

# 'विधानभवनात नो एन्ट्री, फक्त शिस्तच चालणार!'

## अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सभापती प्रा. राम शिंदे कडाडले



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ विधानभवन ही राज्याची सर्वोच्च वास्तू आहे. येथे शिस्त आणि सुरक्षा यालाच सर्वोच्च प्राधान्य असेल. गर्दीचा गोंधळ घालणाऱ्यांना थारा मिळणार नाही. सुरक्षा यंत्रणेने नियोजन चोख ठेवावे, अन्यथा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, अशा कडक शब्दांत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी प्रशासनाला सुनावले.

आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ च्या पार्श्वभूमीवर विधानभवनात आयोजित पूर्वतयारी बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी केवळ आढावाच घेतला नाही, तर सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना कामात कसूर न ठेवण्याचे थेट 'अल्टिमेटम' दिले.

घुसखोरी आणि गर्दीवर सर्जिकल स्ट्राईक!

अधिवेशनादरम्यान होणारी अनावश्यक गर्दी हा नेहमीच डोकेदुखीचा विषय ठरतो. यावर सभापतींनी यंदा कठोर भूमिका घेतली आहे.

स्वतंत्र प्रवेशद्वार: अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या हालचालींसाठी वेगळी व्यवस्था करण्याचे निर्देश दिले असून, प्रवेश नियंत्रण इतके कडक असेल की विनापरवाना व्यक्तीला आत पाऊलही टाकता येणार नाही.

सुरक्षा कडेकोट: मुंबई पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवावा आणि कुठल्याही प्रकारची सुरक्षा त्रुटी राहू नये, अशा सूचना त्यांनी अपर पोलीस आयुक्त डॉ. अभिनव देशमुख यांना दिल्या.

पाणी, वीज आणि जेवण... गुणवत्तेत तडजोड नाही!

सभापतींनी केवळ सुरक्षेवरच नव्हे, तर सोयीसुविधांवरही आक्रमक पवित्रा घेतला आहे:

उपहारगृह स्कॅनरखाली: उपहारगृहातील अन्नाचा दर्जा आणि स्वच्छता तपासायला अन्न व औषध प्रशासनाचे (ऋऊ-) पथक तैनात असेल. जेवण उत्तमच हवे आणि ते उशिरापर्यंत उपलब्ध असावे, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

पाणी आणि वीज: सार्वजनिक बांधकाम विभाग आणि विद्युत विभागाने अखंडित सेवा देण्याचे आदेश दिले आहेत. ऐन अधिवेशनात तांत्रिक बिघाड झाल्यास संबंधित विभागाला जबाबदार धरले जाईल, असा इशाराही बैठकीत देण्यात आला.

आरोग्य व्यवस्था: अनुभवी डॉक्टरांची टीम आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा २४ तास सज्ज ठेवण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत.

प्रशासकीय 'युद्धपातळी'वर तयारी

बैठकीला विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यासह विविध खात्यांचे सचिव उपस्थित होते. सभापतींनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सक्त ताकीद दिली आहे की, सभा मंडप आणि उर्वरित सर्व कामे अधिवेशनाच्या मुहूर्तापूर्वी पूर्ण झालीच पाहिजेत.

रेल्वे विभागानेही सदस्यांच्या प्रवासाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे स्पष्ट करण्यात आले.

अधिवेशन काळात येणाऱ्या पत्रकारांना वार्तांकनात कोणतीही अडचण येऊ नये, त्यांच्यासाठी सुसज्ज मंडप आणि सुविधा पुरवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे, असेही प्रा. शिंदे यांनी यावेळी निक्षून सांगितले.

थोडक्यात: यंदाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन हे केवळ घोषणांचेच नाही, तर कडक शिस्तीचेही ठरणार असल्याचे चित्र प्रा. राम शिंदे यांच्या आक्रमक भूमिकेमुळे स्पष्ट झाले आहे.

## हर्षवर्धन सपकाळ यांना अटक करा- हेमंत पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे /प्रतिनिधी**/ छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतानशी करून महाराजांच्या शौर्याचा आणि हिंदवी स्वराज्याचा अपमान करणाऱ्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना तात्काळ अटक करावी, अशी जोरदार मागणी 'भारत अगेन्स्ट करप्शन'चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी सोमवारी केली.

महापुरुषांचा अपमान करण्याची वृत्ती काँग्रेसच्या डीएनएतच आहे, अशी बोचरी टीकाही त्यांनी यावेळी केली.

सपकाळ यांच्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद उमटण्यास सुरुवात झाली असून, पुण्यात काँग्रेस कार्यालयासमोर भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये तुफान दगडफेक झाली.

**पुढील वृत्त पान २ वर..**

# सावधान! उद्या मुंबई तुंबणार?

### मोदी-मॅक्रॉन यांच्या दौऱ्यामुळे दक्षिण मुंबईतील रस्ते बंद; घराबाहेर पडण्यापूर्वी 'हे' नियम वाचा



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ उद्या, १७ फेब्रुवारी रोजी देशाची आर्थिक राजधानी मुंबईत दोन जागतिक नेत्यांचा महासंगम होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्या उपस्थितीत गेट वे ऑफ इंडिया येथे भव्य सांस्कृतिक सोहळा रंगणार आहे. या व्हीव्हीआयपी (VVIP) दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईत कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, वाहतुकीत मोठे फेरबदल करण्यात आले आहेत.दौऱ्याचे मिनिट-टू-मिनिट नियोजन:दुपारपासूनच मुंबईत हालचालींना वेग येणार आहे.

दौऱ्याचे संभाव्य स्वरूप खालीलप्रमाणे असेल:दुपारी २.१५: पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मुंबईत आगमन.दुपारी २.३०: 'लोकभवन' (पूर्वीचे राजभवन) येथे दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय बैठक.दुपारी ५.००: हॉटेल ताज येथे नामवंत कंपन्यांच्या सीईओंसोबत 'राऊंडटेबल' चर्चा. सायंकाळी ६.३०: गेट वे ऑफ इंडिया येथे 'Indo-France Year of Innovation' सांस्कृतिक कार्यक्रमाचा शुभारंभ.

वाहतुकीत मोठे बदल: हे मार्ग टाळा!मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत दक्षिण मुंबईतील खालील प्रमुख मार्ग सर्वसामान्य वाहनांसाठी बंद राहतील: बंद असणारे मार्गपर्यायी मार्ग / वळवलेली वाहतूकछत्रपती शिवाजी महाराज मार्ग व श्यामाप्रसाद मुखर्जी चौकहा मार्ग पूर्णपणे बंद असेल. फक्त आपत्कालीन वाहनांना परवानगी. पी. रामचंदानी मार्ग (नॉर्थ कोर्ट ते ॲडम स्ट्रीट जंक्शन) वाहतूक पूर्णपणे बंद.रिगल जंक्शनकडे जाणारी वाहतूकही वाहतूक शहीद भगतसिंग मार्ग, महाकवी भूषण रोड आणि बीके बोमन बेहराम रोडकडे वळवण्यात आली आहे.रेडिओ क्लब परिसरपी. रामचंदानी मार्गावरील वाहतूक अल्वा चौक, रेडिओ क्लब, हाजी नियाज आझम रोड मार्गे वळवण्यात येईल.महत्त्वाची सूचना: पी. रामचंदानी मार्ग आणि ॲडम स्ट्रीटवरील सर्व टॅक्सी स्टँड आणि बेस्ट बसचे थांबे उद्या तात्पुरते बंद राहतील. प्रवाशांनी याची नोंद घ्यावी.का होत आहे हा दौरा?फ्रान्सच्या वाणिज्य दूतवासाच्या वतीने १४ ते २२ फेब्रुवारी २०२६ दरम्यान 'भारत-फ्रान्स इनोव्हेशन इयर' साजरे केले जात आहे. यातील मुख्य कार्यक्रम उद्या १७ फेब्रुवारीला पार पडणार आहे. या कार्यक्रमामुळे गेट वे ऑफ इंडिया परिसरात मोठी गर्दी आणि व्हीव्हीआयपी हालचाली अपेक्षित आहेत.

पोलिसांचे आवाहन: दक्षिण मुंबईत कामासाठी येणाऱ्या नागरिकांनी शक्यतो लोकल ट्रेनचा वापर करावा आणि रस्ते मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे. विनाकारण होणारी गैरसोय टाळण्यासाठी वरील बदलांची नोंद घेऊनच प्रवासाचे नियोजन करावे.

# गरजूंना वेळेत व गुणवत्तापूर्ण धान्य उपलब्ध करा; राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांचे निर्देश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राज्यात कोणीही उपाशी राहू नये, हा शासनाचा मुख्य उद्देश आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत, विशेषतः गरजू लाभार्थ्यांपर्यंत वेळेत आणि दर्जेदार धान्य पोहोचवणे ही प्रशासनाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे.

या प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या (झऊड) आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अन्न आयोगाचे सदस्य सुभाष राऊत, बबन मसाले, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांच्यासह शिक्षण, आरोग्य आणि पुरवठा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

प्रशासनाला दिलेले महत्त्वाचे आदेश

बैठकीत ढवळे यांनी अन्नधान्य साठा आणि वितरण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर भर दिला.

पारदर्शकता आणि तपासणी: ई-पीओएस (e-POS) यंत्रणेद्वारे होणाऱ्या धान्य वितरणात पारदर्शकता राखली जावी. अपात्र लाभार्थ्यांची नावे तातडीने वगळून खऱ्या पात्र लाभार्थ्यांचा समावेश करावा.तक्रार निवारण: धान्य वितरणाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश त्यांनी दिले.समन्वय: अन्न सुरक्षा योजनेचा लाभ पोहोचवण्यासाठी पुरवठा, आरोग्य आणि शिक्षण विभागाने समन्वयाने काम करावे.

'भूक व भीक मुक्त महाराष्ट्र' संकल्पना

महाराष्ट्र शासनाचा 'भूक व भीक मुक्त महाराष्ट्र' हा संकल्प पूर्ण करण्यासाठी समाजातील उपेक्षित घटकांकडे विशेष लक्ष देण्याची गरज ढवळे यांनी व्यक्त केली. यामध्ये प्रामुख्याने रस्त्यांवरील सिग्नलवर




भीक मागणारे व्यक्ती.विधवा आणि एकल जीवन जगणारे नागरिक.दिव्यांग आणि दुर्धर आजाराने ग्रस्त व्यक्ती.ग्रामीण भागातील शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक.

या सर्व घटकांना अन्नाचा मूलभूत हक्क मिळावा, यासाठी प्रशासनाने शोध घेऊन त्यांना मदतीचा हात द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

राज्य अन्न आयोग सध्या जिल्ह्याच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात आयोगाचे सदस्य जिल्ह्यातील विविध शासकीय धान्य दुकानांना (रेशन दुकाने) प्रत्यक्ष भेटी देणार आहेत. वितरण प्रक्रियेची पाहणी करण्यासोबतच ते थेट लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणार आहेत.या बैठकीला जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी संदीप शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आणि इतर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये १८ फेब्रुवारीला भव्य 'रोजगार मेळावा'; १५७ पदांसाठी होणार 'ऑन द स्पॉट' निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** बेरोजगार तरुणांसाठी रोजगाराची एक मोठी संधी चालून आली आहे. शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथे 'जागेवर निवड संधी' (On the spot selection) रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती बसस्थानक रोड, मालजीपुरा येथे आयोजित करण्यात आला आहे. मुलाखतींची प्रक्रिया सकाळी १० वाजल्यापासून सुरू होईल.

या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होत असून साधारणपणे १५७ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील कंपन्यांचा समावेश आहे.औरंगाबाद ऑटो न्सीलरी प्रा. लि.,युवान ईलेक्ट्रीकल्स प्रा. लि.,इंडसलंड जनरल इन्शुरन्स

पात्रता-विविध पदांसाठी खालीलप्रमाणे पात्रता धारक उमेदवार या मेळाव्यात सहभागी होऊ शकतात:

पदवीधर (any Graduate) डिप्लोमा (मेकॅनिकल / इलेक्ट्रीकल / इलेक्ट्रॉनिक्स) ITI (सर्व ट्रेड्स)

१२ वी (HSC) आणि १० वी उत्तीर्ण असावे.

सहभागी कसे व्हायचे? (महत्त्वाच्या सूचना)

उमेदवारांना या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत.१. ऑनलाइन अर्ज: इच्छुक उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन आपल्या युजर आयडी आणि पासवर्डने लॉगिन करावे आणि उपलब्ध रिक्त पदांसाठी ऑनलाइन 'अप्लाय' करावे.

२. थेट उपस्थिती: ज्या उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करणे शक्य नाही, त्यांनी आपल्या बायोडाटाच्या (Resume) किमान पाच प्रती सोबत घेऊन मेळाव्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहावे. नोंदणी करताना किंवा अर्ज करताना काही तांत्रिक अडचण आल्यास उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत ०२४०-२९५४८५९ या क्रमांकावर संपर्क साधावा. पात्र उमेदवारांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# लोककलेचा अपमान! वेरूळच्या महाशिवरात्री उत्सवात मद्यधुंद हुल्लडबाजांचा हैदोस; तमाशा कलावंतांवर दगडफेक

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** जागतिक वारसा लाभलेल्या वेरूळ नगरीत महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर लोककलेचा जागर होण्याऐवजी मद्यधुंद प्रेक्षकांच्या अश्लाघ्य वर्तनामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले. रविवारी (दि. १५) आयोजित 'लोकनाट्य तमाशा मंडळ भिका भीमा सावंगीकर' यांच्या फडात काही मद्यधुंद इसमांनी थेट रंगमंचाच्या दिशेने दगडफेक आणि दारूच्या बाटल्या भिरकावल्या. या भ्याड हल्ल्यामुळे कार्यक्रम अर्ध्यावरच बंद करण्याची नामुष्की ओढवली असून, महिला कलावंतांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

महाराष्ट्रात सध्या यात्रा-उत्सवांचा हंगाम जोरात सुरू आहे.

याच निमित्ताने वेरूळ येथे गणेश राजेश सांगवीकर यांच्या तमाशा फडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रात्री कार्यक्रम रंगात आलेला असताना, प्रेक्षकांमध्ये बसलेल्या काही मद्यधुंद टोळक्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. केवळ गोंधळच नव्हे, तर या हुल्लडबाजांनी थेट कलावंतांच्या दिशेने दगड आणि रिकाम्या बाटल्या भिरकावल्या.



यात महिला कलावंतांना लक्ष्य करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आणि जिवाच्या आकांताने कलावंतांना रंगमंच सोडावा लागला.

लोककला की हुल्लडबाजीचा अड्डा?

तमाशा ही महाराष्ट्राची शेकडो वर्षांची परंपरा आहे. मात्र, अलीकडच्या काळात 'आयटम साँग्स'ची मागणी आणि वाढती व्यसनाधीनता यामुळे या कलेचे स्वरूप विद्रूप होत चालले आहे.

असुरक्षित महिला कलावंत: महिला कलाकारांना व्यासपीठावर वावरताना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे. अस्मितेवर घाला: ज्या मातीत लावणी आणि गण-गवळण जन्मली, त्याच मातीत कलेचा असा अपमान होणे ही राज्यासाठी शरमेची बाब आहे.

**उदरनिर्वाहाचा प्रश्न:** तमाशावर लाखो कुटुंबांची चूल अवलंबून आहे, मात्र अशा हिंसक घटनांमुळे प्रेक्षक पाठ फिरवत असून ही कला आता '**इतिहासजमा**' होण्याच्या मार्गावर आहे.

आम्ही रात्रंदिवस मेहनत करून प्रेक्षकांचे मनोरंजन करतो. पण जर आमच्या अंगावर दगड आणि बाटल्या येणार असतील, तर आम्ही कला सादर करायची तरी कशी? ही केवळ दगडफेक नाही, तर आमच्या पोटावर मारलेला लाथ आहे.

**- गणेश राजेश सावंगीकर**
**(मालक, भिका भीमा तमाशा फड)**

**पोलिसांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात?**

इतकी गंभीर घटना घडूनही अद्याप खुलताबाद पोलीस स्टेशनमध्ये कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. गुन्हा दाखल का झाला नाही? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. अशा प्रवृत्तींना वेळीच चाप लावला नाही, तर भविष्यात एखाद्या कलावंताचा बळी जाण्याची वाट प्रशासन पाहत आहे का? असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

मद्यधुंद अवस्थेत येऊन कलावंतांचा अपमान करणाऱ्या या नराधमांना केवळ 'प्रेक्षक' म्हणणे चुकीचे ठरेल. हे लोककलेचे वैरी आहेत.

प्रशासनाने अशा कार्यक्रमांना संरक्षण दिले पाहिजे आणि जे हुल्लडबाजी करतात, त्यांना जाहीरपणे अद्दल घडवली पाहिजे. अन्यथा, महाराष्ट्राच्या तमाशाचा तंबू कायमचा उखडला जाईल.

# भविष्यातील भारताचे 'एआय' स्वप्न आणि वास्तवातील पाऊलखुणा

तंत्रज्ञानाच्या युगात भारत आता केवळ एक 'वापरकर्ता' (User) न राहता 'निर्माता' (Creator) बनण्याच्या दिशेने वेगाने पाऊल टाकत आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे सुरू झालेली 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' ही केवळ एक परिषद नसून, ती भारताच्या तांत्रिक सार्वभौमत्वाची आणि जागतिक नेतृत्वाची द्वाही देणारी घटना आहे. सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय या ब्रीदवाक्यासह सुरू झालेला हा सोहळा मानवतेच्या कल्याणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) प्रभावी वापर करण्याच्या भारताच्या संकल्पाचा आरसा आहे.गुगलचे सुंदर पिचाई, ओपनएआयचे सॅम ऑल्टमन आणि मायक्रोसॉफ्टचे ब्रॅड स्मिथ यांसारख्या जागतिक टेक दिग्गजांची उपस्थिती या कार्यक्रमाचे गांभीर्य स्पष्ट करते. जेव्हा जगातील सर्वात प्रभावशाली कंपन्यांचे प्रमुख भारतात एकत्र येतात, तेव्हा त्याचा अर्थ स्पष्ट असतो: भारत ही भविष्यातील एआय क्रांतीची प्रयोगशाळा आणि सर्वात मोठी बाजारपेठ आहे. एनव्हीडियाचे जेन्सेन हुआंग यांची अनुपस्थिती वगळता, जागतिक तंत्रज्ञान विश्वातील सर्व शक्ती सध्या दिल्लीत एकवटल्या आहेत.बदलता भारत: शेती, शिक्षण आणि आरोग्य

या परिषदेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे तंत्रज्ञान केवळ प्रयोगशाळांपुरते मर्यादित न ठेवता ते थेट सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

शेती: हवामान बदलाचा अचूक अंदाज आणि पीक व्यवस्थापनात एआयचा वापर करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.

शिक्षण: विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार शिक्षण पद्धतीत बदल घडवून आणण्यासाठी एआय एक महत्त्वाचे साधन ठरणार आहे.आरोग्यसेवा: दुर्गम भागात एआयच्या माध्यमातून अचूक निदान आणि स्वस्त उपचार पोहोचवणे आता शक्य होणार आहे.एआय म्हटलं की 'नोकऱ्या जातील का?' ही भीती सर्वसामान्यांच्या मनात असते. या परिषदेत या मुद्द्यावर होणारी चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे. एआयमुळे नोकऱ्या जाणार नाहीत, तर नोकऱ्यांचे स्वरूप बदलेल, हे वास्तव स्वीकारून तरुणांना नवीन कौशल्यांनी (Upskilling) सज्ज करणे हे सरकार आणि उद्योगांसमोरील मोठे आव्हान आहे. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देऊन अर्थव्यवस्थेला नवी गती देणे, हा या समिटचा मुख्य गाभा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटल्याप्रमाणे, तंत्रज्ञान जेव्हा मानवतेच्या प्रगतीसाठी वापरले जाते, तेव्हाच त्याचे सार्थक होते.

३०० हून अधिक कंपन्यांनी सादर केलेले प्रगत गॅझेट्स आणि उपाय हे दाखवून देतात की, आपण एका अशा युगात प्रवेश करत आहोत जिथे 'स्मार्ट' केवळ आपले फोन नसतील, तर आपले संपूर्ण जीवनमान असेल.'इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पो'मध्ये सामान्य जनतेला हे तंत्रज्ञान जवळून अनुभवता येणे, ही एक मोठी संधी आहे. जर आपण या तंत्रज्ञानाचा स्वीकार नैतिक मूल्ये राखून केला, तर भारत नक्कीच 'एआय'च्या क्षेत्रात जगाचे नेतृत्व करेल यात शंका नाही.

# नातेसंबंध म्हणजे प्रतिष्ठेशी खेळण्याचा परवाना नव्हे: झारखंड उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत आणि डिजिटल क्रांतीच्या काळात मानवी नातेसंबंधांचे स्वरूपही बदलत आहे. मात्र, संबंधांमधील जवळीक म्हणजे एकमेकांच्या प्रतिष्ठेशी खेळण्याचा परवाना नव्हे, हा एक अत्यंत कडक आणि स्पष्ट संदेश झारखंड उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निकालातून दिला आहे. एका महिलेची सोशल मीडियाद्वारे बदनामी करणाऱ्या पुरुषाचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळताना न्यायालयाने व्यक्त केलेले मत स्त्री-पुरुष समानतेच्या आणि गोपनीयतेच्या अधिकाराच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणार आहे.

प्रकरणाची पार्श्वभूमी आणि गंभीर आरोप

या प्रकरणातील याचिकाकर्ता आणि फिर्यादी महिला यांची भेट २०२१ मध्ये झाली होती. दोघेही एकाच ठिकाणी कार्यरत असताना त्यांच्यात मैत्री झाली आणि पुढे त्याचे रूपांतर जवळच्या संबंधांमध्ये झाले. मात्र, काही काळानंतर या नात्यात दुरावा आला. आरोपानुसार, या व्यक्तीने बदला घेण्याच्या भावनेतून फिर्यादी महिलेच्या नावाने बनावट ईमेल आयडी आणि सोशल मीडिया खाती तयार केली. इतकेच नव्हे, तर तिची खासगी माहिती आणि अश्लील छायाचित्रे तिच्या कार्यालयातील वरिष्ठांना (कुलगुरूंना) आणि नातेवाईकांना पाठवून तिची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळवण्याचा प्रयत्न केला.

न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

न्यायमूर्ती संजय कुमार द्विवेदी यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी करताना स्पष्ट केले की, जरी दोन व्यक्तींमध्ये सहमतीने संबंध असले, तरी त्यातील एकाला दुसऱ्याच्या गोपनीयतेचा भंग करण्याचा किंवा त्याचे शोषण करण्याचा अधिकार मिळत नाही. न्यायालयाने पुढे नमूद केले की, अशा कृत्याला केवळ 'मैत्री' म्हणता येणार नाही. तपासात असे निष्पन्न झाले की, गुन्ह्यासाठी वापरलेला मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी याचिकाकर्त्याशी संबंधित होते, ज्यामुळे त्याचे कृत्य हेतुपुरस्सर असल्याचे सिद्ध झाले.

कायदेशीर तरतुदींचा कडक फास

याचिकाकर्त्यावर भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ आणि माहिती तंत्रज्ञान कायदा (IT act), २००० च्या विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने:

कलम ७९ (BNS): महिलेच्या विनयशीलतेचा भंग करणारे शब्द किंवा कृत्य.

माहिती तंत्रज्ञान कायदा (कलम ६७, ६७अ): इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अश्लील साहित्य प्रसारित करणे.

फसवणूक आणि बदनामी: बनावट खाती तयार करून प्रतिमा मलिन करणे.

तज्ज्ञ मत: महेश धनावत यांचे प्रतिपादन

या निकालावर भाष्य करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष महेश धनावत यांनी या निकालाचे स्वागत केले आहे. ते म्हणतात झारखंड उच्च न्यायालयाचा हा निकाल आजच्या 'डिजिटल रिव्हेंज' (बदला घेण्याची प्रवृत्ती) च्या काळात अत्यंत आवश्यक होता. अनेकदा नातेसंबंध बिघडल्यानंतर जोडीदाराला ब्लॅकमेल करण्यासाठी किंवा त्याला समाजात अपमानित करण्यासाठी सोशल मीडियाचा शस्त्र म्हणून वापर केला जातो. हा निकाल अशा प्रवृत्तींना चाप लावणारा आहे. भारतीय न्याय संहिता आणि आयटी कायदा पीडितेच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी पूर्णपणे सक्षम आहेत, हेच यातून अधोरेखित होते.

पीडितांसाठी धडा आणि संदेश

या निकालातून काही महत्त्वाच्या बाबी समोर येतात:

संमती म्हणजे मालकी नव्हे: कोणत्याही नात्यात संमती असली तरी ती कायमस्वरूपी नसते आणि ती गोपनीयतेचा अधिकार हिरावून घेत नाही.

सायबर पुरावे महत्त्वाचे: डिजिटल जगात तुम्ही लपून कृत्य करू शकत नाही; तांत्रिक तपासणीत आयपी ड्रेस आणि मोबाईल क्रमांक गुन्हेगाराला उघड पाडतात.

भीती सोडून तक्रार करा: बदनामीच्या भीतीने गप्प न बसता कायद्याची मदत घेतल्यास न्याय मिळतो, हे या महिलेने दाखवून दिले आहे.

झारखंड उच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ एका व्यक्तीचा जामीन नाकारण्यापुरता मर्यादित नाही, तर तो समाजातील वाढत्या सायबर गुन्हेगारीला आणि 'रिलेशनशिप अब्यूज'ला दिलेला लगाम आहे. नात्यातील विश्वास जपला नाही, तर कायद्याचा हात किती लांब असू शकतो, याची जाणीव या निमित्ताने करून देण्यात आली आहे.

**विशेष लेख:** महेश धनावत

## हर्षवर्धन सपकाळ यांना ..पान १ वरून...

या घटनेचा संदर्भ देत पाटील म्हणाले की, सपकाळ यांच्या वक्तव्यामुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्था धोक्यात आली आहे. केवळ विशिष्ट वर्गाच्या तुष्टीकरणासाठी त्यांनी केलेले विधान धक्कादायक असून समाजात तेढ निर्माण करणारे आहे.

पाटील यांनी ऐतिहासिक दाखले देत हर्षवर्धन सपकाळ यांच्या विधानातील फोलपणा स्पष्ट केला. त्यांच्या मते राज्यनिर्मिती: छत्रपती शिवाजी महाराजांनी शून्यातून पूर्णपणे नवीन 'हिंदवी स्वराज्य' उभे केले. तुलना अयोग्य: टिपू सुलतानाने केवळ अस्तित्वात असलेल्या मैसूर राज्याचा विस्तार आणि आधुनिकीकरण केले.पार्श्वभूमी: दोघांचा कालखंड, उद्दिष्टे आणि संघर्षाची पार्श्वभूमी पूर्णपणे भिन्न असताना त्यांना 'समकक्ष' मानणे हे ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचे आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आणि राज्यातील जनतेच्या भावना सपकाळ यांनी दुखावल्या आहेत. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राची बिनशर्त माफी मागायला हवी.

- हेमंत पाटील, अध्यक्ष, भारत अगेन्स्ट करप्शन.

हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या विधानाचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचा दावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केले होते. मुख्यमंत्र्यांनी हिंदू-मुस्लिम वाद निर्माण करण्याची संधी शोधली आहे, या सपकाळांच्या आरोपाचा पाटील यांनी तीव्र निषेध केला. राज्याच्या प्रमुखावर अशा प्रकारे संभ्रम निर्माण करणारे आरोप करून सपकाळ आपली चूक लपवू शकत नाहीत, त्यामुळे त्यांना अटक होणेच गरजेचे आहे, असे पाटील यांनी ठामपणे मांडले.

# सारोळा येथे महाशिवरात्रीनिमित्त जपानुष्ठान सोहळ्याची मोठ्या उत्साहात सांगता

**स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत भव्य मिरवणूक आणि महाप्रसादाचे आयोजन**

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** तालुक्यातील सारोळा येथील प्रसिद्ध नागेश्वर महादेव मंदिर परिसरात महाशिवरात्रीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय जपानुष्ठान सोहळ्याची सोमवार, दिनांक १६ रोजी भक्तिमय वातावरणात सांगता झाली. श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने आणि प्रत्यक्ष उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

गेल्या सात दिवसांपासून या ठिकाणी नित्यनियम विधी, अभिषेक, आरती, प्रवचन आणि हरिपाठ असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. या अनुष्ठानामुळे संपूर्ण सारोळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.सोहळ्याच्या सांगता दिनी संपूर्ण गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये विविध भजनी मंडळी, लेझीम पथक आणि भक्तिगीते गाणारे भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अबालवृद्धांच्या





उत्साहाने मिरवणुकीत चैतन्य पसरले होते.याप्रसंगी भाविकांना मार्गदर्शन करताना महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज म्हणाले की, जोडोनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी. मनुष्याने नीती, न्याय आणि मर्यादेचे पालन करूनच धन संपादन करावे आणि त्याचा विनियोग सत्कर्मासाठी व दानासाठी करावा. आत्मसाक्षात्कार आणि मोक्षप्राप्तीसाठी प्रथम असत्याचा (मिथ्याचा) त्याग करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रवचनातून सांगितले.केवळ अध्यात्मच नव्हे तर सामाजिक भान जपण्याचा संदेशही स्वामीजींनी यावेळी दिला. येत्या पावसाळ्यात प्रत्येकाने किमान एक झाड लावावे, शेतीच्या बांधावर पाणी अडवून ते जिरवावे, तसेच आई-वडील आणि गोमाता यांची सेवा करावी, असे आवाहन त्यांनी उपस्थित भक्तांना केले.कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी सारोळा परिसरासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## शिवरायांचा अपमान होत असताना उद्धव ठाकरे गप्प का?

**'भाजपचे नवनाथ बन यांचा तिखट सवाल**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानशी केल्याच्या प्रकरणावरून आता राजकारण चांगलेच तापले आहे. या मुद्द्यावरून भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. शिवरायांचा अवमान होत असताना फेसबुक लाईव्ह करणारे उद्धव ठाकरे आता मूग गिळून गप्प का बसले आहेत? असा परखड सवाल त्यांनी सोमवारी उपस्थित केला.

उद्धव ठाकरेंची 'दातखीळ' बसली आहे का?

नवनाथ बन यांनी उद्धव ठाकरेंच्या भूमिकेवर शंका उपस्थित करताना म्हटले की, कोणत्याही शुल्लक कारणावरून भाजपवर टीका करणारे ठाकरे गेल्या तीन दिवसांपासून या गंभीर विषयावर शांत आहेत. काँग्रेसच्या पाठिंब्याशिवाय पुन्हा आमदार होण्याचे स्वप्न साकार होणार नाही, हे लक्षात आल्यानेच उद्धव ठाकरेंची दातखीळ बसली आहे का? असा टोला त्यांनी लगावला. जर त्यांच्यात थोडाही स्वाभिमान आणि धमक शिल्लक असेल, तर त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या फोटोला 'जोडे मारो' आंदोलन करून दाखवावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

टिपू सुलतानवरून संजय राऊतांना सुनावले

संजय राऊत या प्रकरणाचा संबंध निवडणुकीशी जोडत असल्याचा आरोप करत बन यांनी त्यांना खडे बोल सुनावले. भाजपसाठी शिवरायांचा सन्मान हा निवडणुकीचा नाही, तर अस्मितेचा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मालवणी पार्कचा वाद: महाविकास आघाडी सरकारच्या काळात अस्लम शेख यांनी एका उद्यानाला टिपू सुलतानचे नाव देण्याचा प्रयत्न केला होता, तेव्हा भाजपने रस्त्यावर उतरून संघर्ष केला होता.

भाजपचा विरोध: मंगल प्रभात लोढा, गोपाळ शेट्टी आणि अतुल भातखळकर यांसारख्या नेत्यांनी लाठ्या-काठ्या खाल्या पण नाव बदलू दिले नाही. उलट, मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंनी भाजप कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याचे 'हीन' काम केले होते, अशी आठवण बन यांनी करून दिली.

हर्षवर्धन सपकाळ यांनी माफी मागावी

ज्याने हिंदू मंदिरांची तोडफोड केली आणि हिंदूंवर अत्याचार केले, अशा टिपू सुलतानचे समर्थन भाजप कधीच करणार नाही, असे सांगत बन यांनी हर्षवर्धन सपकाळ यांना इशारा दिला. सपकाळ यांनी महाराष्ट्राची माफी न मागितल्यास भाजप स्टाईलने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असे त्यांनी निक्षून सांगितले.

मनी लॉन्ड्रिंग: मनी लॉन्ड्रिंग करण्यात काँग्रेस 'एक्सपर्ट' असून मल्लिकार्जुन खर्गे यांनी याबाबत पी. चिदंबरम यांना विचारले पाहिजे, असा टोला त्यांनी लगावला.

संजय राऊतांवर टीका: खासदारकी संपली की राऊत पुन्हा काँग्रेसच्या आश्रयाला जातील, हे महाराष्ट्राला ठाऊक आहे.

पहलगाम हल्ल्यातील मृताच्या कुटुंबाला न्याय: पहलगाम हल्ल्यात शहीद झालेले पुण्याचे संतोष जगदाळे यांच्या कुटुंबाला महायुती सरकार न्याय देईल. त्यांच्या कुटुंबातील सदस्याला तातडीने शासकीय नोकरी मिळवून देण्यासाठी भाजप कटिबद्ध असल्याचे बन यांनी जाहीर केले.

# भारतातील वाढती महागाई,शेतकऱ्यांच्या समस्या व बेरोजगारीचे काय?

सध्याच्या परिस्थितीत सुपर पॉवर अमेरिका जगातील अनेक देशांशी आपली स्वार्थी चाल खेळुन दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.अमेरिका जरी सुपर पॉवर असला तरी तो दगाबाज आणि धोकेबाज देश आहे ही बाब जगातील प्रत्येक देशाला चांगल्या प्रकारे ग्यात आहे. सर्वप्रथम भारता विरुद्ध टेरिफ वाढवुन भारताचा विश्वासघात केला. भारताने अमेरिकेची टेरिफ चाल पहाता आपण आपला मित्र देश रशिया जास्त जवळीक केली.त्याचबरोबर अमेरिकेला अलगथलग करण्यासाठी व त्याची अरेरावी कमी करण्यासाठी रशियाचा मित्र चीन आणि भारताचा कट्टर शत्रू यांची रशियाच्या सहाय्याने जवळीक वाढली आणि अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्यासाठी म्हणून भारत,रशिया आणि चीन एकत्र येऊन याचा व्यापारीक करार मोठ्या प्रमाणात करण्यात आला.या तिन देशांच्या जवळीकला दोन ते तीन महिने होताच अमेरिकेने भारतावरील प्रेम वाढविले आणि टेरिफ कमी करण्याची घोषणा करत अनेक व्यापारीक करार झाले.

परंतु हे संपूर्ण करार रशिया,चीन आणि भारत यांच्यात व्दीधा निर्माण करून अमेरिकेने भारताला पुन्हा जवळ केले यावरून भारताने अमेरिके पासून सावध रहाण्याची गरज आहे.अमेरिकेने अफगाणिस्तान, युक्रेन इत्यादी अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पसार झाला अशा प्रकारे जगातील अनेक देशांना आपल्या वर्चस्वासाठी आणि स्वार्थासाठी धोका दिला आहे.त्याच पध्दतीने अमेरिका भारतासोबत व्यापार व्यवहार करू शकतो याला नाकारता येत नाही.कारण अमेरिका कधीच कोणाचाच झाला नाही आणि होणार नाही.तो फक्त आपले व्यापारीक स्वार्थ शोधत असतो व त्याच्या सोबतच दोस्तीचा हात समोर करतो.परंतु त्या देशाला ब्लॅकमेल करून केव्हाही धोका सुद्धा देऊ शकतो.अमेरिकेने भारतासोबत व्यापार करार तर केलेत यातही त्याची अरेरावी दिसून येते.अमेरिका म्हणतो की, भारताने आमच्या कडून कापूस आयात केला तर टेक्सटाइलवर झिरो टेरिफ लागेल.परंतु भारताने जर अमेरिकेतून कापूस आयात केला तर भारतीय शेतकऱ्यांच्या कापसाला कवडीमोलाचे भाव येतील हेही तितकेच सत्य आहे. यावरून स्पष्ट होते की अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतीय शेतकऱ्यांची कंबर तोडण्याच्या प्रयत्न करीत आहे. भारतात शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत.अजुनही भारतातील शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही.याकरीता अनेकदा आंदोलने होतांना आपण पहाले आणि आताही आंदोलने होत आहेत. परंतु कृषी प्रधान देशातील शेतकऱ्यांना अजुन पर्यंत योग्य न्याय मिळालेला नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.विदेश निती टीकवुन ठेवण्यासाठी भारताचा अमेरिके सोबतचा करार योग्य आहे. परंतु भारताने हेही लक्षात ठेवले पाहिजे की पाकिस्तान,चीन पेक्षा जास्त दगाबाज अमेरिका सुद्धा आहे ही बाब संपूर्ण जग जाणतो.अमेरिकेच्या लक्षात आले की भारत,रशिया, चीन एकत्र आले तर आपली खैर नाही.त्यामुळेच अमेरिकेने टॅरिफ डाव खेळल्याचे स्पष्ट होते.भारत सरकारला हे लक्षात का येत नाही की, भारतात शेतकरी आत्महत्या का करतात. आजही भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या व आत्महत्या थांबलेल्या नाहीत अशा परिस्थितीत अमेरिकेतील वस्तू जर भारतात कमी भावात मिळाली तर शेतकऱ्यांच्या मालाच्या भावाचे काय? असे अनेक प्रश्न आज शेतकऱ्यांपुढे उपस्थित होत आहे. भारताने अमेरिकेशी व्यापार करार करतांना हेही लक्षात ठेवले पाहिजे की,भारतातील महागाई, वाढत्या आधुनिकीकरणामुळे वाढती बेरोजगारी, ईपीएस - ९५ पेंशन धारकांचा प्रश्न, वाढते कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या संपूर्ण गंभीर समस्यांचे मुख्य कारण देशातील वाढती महागाई आहे.

भारत सरकार देशातील महागाईकडे दुर्लक्ष करून अमेरिकेसोबत वाटेल ते करार करून देशात महागाईचा डोंगर उभा होत आहे यावर सुद्धा सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.देशाचा विकास झपाट्याने होत आहे यात दुमत नाही.परंतु बेरोजगारीचा मोठा कळस उभा होत आहे या संपूर्ण गोष्टींकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण देशाच्या विकासासोबत मुलभूत सुविधांकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे.याकडे दुर्लक्ष झाले तर गरीब व सर्वसामान्यांचे हाल बेहाल होतील. कारण देशात अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु एकाही सरकारने महागाईवर ठोस तोडगा काढलाच नाही. याचा परिणाम आजही देशातील ८० टक्के जनता महागाईच्या रूपात भोगत आहेत.देशातील महागाई कमी झाली तर सर्वच समस्या आपोआप कमी होईल.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# कर्तव्यदक्षतेची २४ वर्षे: नायब सुभेदार रमेश तुपे यांचा शेवता येथे ऐतिहासिक नागरी सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री (प्रतिनिधी)** सीमेवर डोळ्यात तेल घालून तब्बल २४ वर्षे भारतमातेचे रक्षण करणारे फुलंब्री तालुक्यातील शेवता येथील सुपुत्र नायब सुभेदार रमेश शालिकराव तुपे हे सैन्यदलातून सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झाले. त्यांच्या या गौरवशाली सेवापूर्तीनिमित्त शेवता ग्रामस्थांच्या वतीने एका भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याने संपूर्ण परिसर देशप्रेमाच्या रंगात न्हाऊन निघाला होता.भव्य मिरवणूक आणि जल्लोष

सेवानिवृत्तीनंतर प्रथमच गावी परतलेल्या नायब सुभेदार रमेश तुपे यांचे स्वागत करण्यासाठी वडोद बाजार ते शेवता खुर्द दरम्यान भव्य मिरवणूक काढण्यात आली. फुलांनी सजवलेली जीप, ढोल-ताशांचा गज आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता. गावातील महिलांनी ठिकठिकाणी त्यांचे औक्षण केले, तर तरुणांनी फटाक्यांची आतषबाजी करत आपल्या लाडक्या सैनिकाचे स्वागत केले.



शेवता येथील मुख्य कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक आणि लष्करी क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी होती. यामध्ये अनुराधा चव्हाण: आमदार, फुलंब्री विधानसभा मतदारसंघ,डॉ. गोपाल वाघ: जिल्हा परिषद सदस्य, वडोद बाजार सर्कल,विशेष अतिथी: परिसरातील सेवानिवृत्त माजी सैनिक आणि परिसरातील प्रतिष्ठित नागरिक कार्यक्रमाच्या सुरुवातीला शेवता येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी बोलताना आमदार अनुराधा चव्हाण यांनी रमेश तुपे यांच्या कार्याचा गौरव केला. देशासाठी आयुष्याची २४ वर्षे समर्पित करणे ही अभिमानाची गोष्ट आहे, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण शिवशाहीर प्रा. स्वप्निल जाधव सर यांचे व्याख्यान ठरले. आपल्या ओघवत्या शैलीत त्यांनी शिवरायांचा इतिहास आणि सैनिकांचे महत्त्व विशद करून उपस्थितांमध्ये चैतन्य निर्माण केले.नायब सुभेदार रमेश तुपे यांनी प्रतिकूल परिस्थितीत बजावलेली देशसेवा ही येणाऱ्या पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल.या कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन राजू काळे सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रकाश तुपे सर यांनी मानले. राष्ट्रगीताने या सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी शेवता आणि परिसरातील ग्रामस्थ, तरुण मंडळी व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मनपा सभांचे थेट प्रक्षेपण करा; पतीराजांच्या हस्तक्षेपावर कारवाईची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना शहर महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी महापालिकेच्या सर्व सभांचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) सार्वजनिक करावे आणि महिला नगरसेविकांच्या जागी त्यांच्या पतींनी किंवा नातेवाईकांनी सभेच्या कामकाजात हस्तक्षेप केल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर आणि जिल्हाधिकारी तथा आयुक्त, जालना महानगरपालिका यांना सविस्तर निवेदन दिले आहे.विकासकुमार बागडी यांनी निवेदनात म्हटले आहे की, महापालिकेत शहराच्या विकासासंबंधी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. मात्र, अनेकदा ठराव गुपित ठेवून भ्रष्टाचाराला वाव दिला जातो. हे रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या २० मे २०२२ च्या परिपत्रकानुसार सर्व सभांचे कामकाज सार्वजनिक करणे बंधनकारक आहे.कलम ८१ (१२): महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ नुसार, सभेचे कार्यवृत्त कोणत्याही रहिवाशास पाहण्यासाठी उपलब्ध करून देणे आणि ते अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे ही महापालिकेची कायदेशीर जबाबदारी आहे.

**व्हिडीओ रेकॉर्डिंग:** प्रत्येक मासिक सभेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करून ते ७ दिवसांच्या आत संकेतस्थळावर आणि सोशल मीडियावर प्रसिद्ध करणे सक्तीचे आहे.

**'पतीराजां'च्या हस्तक्षेपावर चाप लावा**

महानगरपालिकेत निवडून आलेल्या महिला नगरसेविकांच्या हक्काबाबतही बागडी यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. अनेकदा महिला लोकप्रतिनिधींच्या वतीने त्यांचे पती किंवा नातेवाईक सभेच्या कामकाजात हस्तक्षेप करतात. सभेमध्ये केवळ निवडून आलेल्या महिला नगरसेविकांनीच उपस्थित राहणे अनिवार्य आहे. त्यांच्या पतींनी किंवा इतर अनाधिकृत व्यक्तींनी कामकाजात ढवळाढवळ केल्यास त्यांच्यावर तातडीने कठोर निर्देश देऊन कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.शासन निर्णयाचे पालन न झाल्यास संबंधित अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र दप्तर दिरंगाई अधिनियम २००५, महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ आणि भारतीय दंड संहितेच्या कलम १६६ व १६७ अन्वये विभागीय चौकशी व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही विकासकुमार बागडी यांनी प्रशासनाला दिला आहे.

# जातीवाद मानणारा तो 'साहित्यिक' कसला?
# लोकनाथ यशवंत यांचा जळजळीत सवाल!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/जो माणूस मनात जातीवाद आणि भेदाभेद जपतो, त्याला साहित्यिक म्हणण्याचा अधिकारच नाही. साहित्याला व्यापकत्व तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा लेखक जातीच्या भिंती ओलांडून माणुसकीची भूमिका घेतो, अशा शब्दांत ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत यांनी प्रस्थापित मानसिकतेवर घणाघाती प्रहार केला.

नांदेड येथे होणाऱ्या २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाल्याबद्दल 'विद्रोही सांस्कृतिक चळवळी'च्या वतीने रविवारी सिडकोतील जिजाऊ सभागृहात त्यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी भारतीय मानसिकतेतील जातीच्या विषवल्लीवर बोट ठेवले.

**डीएनएमधून जात जात नाही!**

सत्काराला उत्तर देताना लोकनाथ यशवंत यांचा स्वर अत्यंत आक्रमक होता. ते म्हणाले आडनावाचा त्याग: भारतीयांच्या डीएनएमधून जात जात नाही. लोक आजही माणसाची ओळख त्याच्या कामाने नाही, तर आडनावावरून करतात. म्हणूनच मी माझ्या नावापुढील आडनाव लावणे कायमचे सोडले आहे.

**साहित्याचा जन्म:** अमरावतीमधील एका वृद्ध मजुराला मालकाकडून मिळालेली अमानुष मारहाण पाहून झालेली अस्वस्थता मला कवितेकडे घेऊन गेली.**भुकेचा लढा:** जगाचे कल्याण आणि प्रत्येकाला दोन वेळचे अन्न हीच माझी भूमिका आहे. पोट रिकामे राहिले की माणसे गुन्हेगारीकडे वळतात, हे वास्तव विसरता कामा नये.

**सावित्रीबाई फुलेच 'आधुनिक कवितेच्या जनक'!**

यावेळी बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी इतिहासाच्या मांडणीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत नसून सावित्रीबाई फुले या आहेत. महात्मा फुले यांनी साहित्य संमेलनावर लिहिलेले पत्र हेच विद्रोही साहित्याचे मूळ सूत्र असून, जातीचे परिप्रेक्ष्य तोडणे हेच या साहित्याचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

**'आजच्या पिढीचा बुलंद आवाज'**

डॉ. संजय मून यांनी लोकनाथ यशवंत यांचा गौरव 'आजच्या पिढीचा आवाज' असा केला. त्यांच्या कवितांना उर्दू शायरीप्रमाणे दाद मिळते, कारण त्या शब्दांपेक्षा आशयाने अधिक समृद्ध असतात, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे होते.या सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार भाऊ भोजने, डॉ. अरुणा लोखंडे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. कमलाकर गंगावणे, डॉ. उत्तम अंभोरे यांसह अनेक क्षेत्रांतील दिग्गज विचारवंत आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भारत शिरसाट यांनी केले, तर आभार डॉ. वैजनाथ कदम यांनी मानले.

## तहसिल कार्यालय,पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. लक्ष्मण छगन जानकर (रा.पिंपळवाडी,ता.पैठण, मो.९४०४८५१८८२) यांनी या कार्यालयाकडे **'जन्म'** व मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम २०२३' अन्वये अर्ज सादर केला आहे.

अर्जामधील तपशील खालीलप्रमाणे आहे:

**बालकाचे नाव:** अविराज (भाचा)

**जन्म ठिकाण:** योगेश्वरी मॅटर्निटी अँड नर्सिंग होम, पैठण.

**जन्मतारीख:** २३/०५/२०२५

अर्जदाराने सदर जन्माच्या नोंदीबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विनंती केली आहे.सदर प्रकरणाबाबत जर कोणाची काही उजर, आक्षेप किंवा हरकत असेल, तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली हरकत मूळ कागदपत्रांसह या न्यायालयात/कार्यालयात नोंदवावी.विहित मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही आणि अर्जदाराच्या जन्म प्रमाणपत्राबाबत पुढील आदेश पारित करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**दिनांक:** १३/०२/२०२६

**स्थळ:** पैठण

**स्वाक्षरी/-**

**तहसिलदार, पैठण**

# सत्तेच्या नादात संसाराची 'धुळधाण'

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी: फिरोज मन्सुरी)** ग्रामीण राजकारणाचे 'मिनी मंत्रालय' समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांनी अनेक उमेदवारांना अक्षरशः रस्त्यावर आणले आहे. सत्तेची खुर्ची मिळवण्यासाठी जमिनी गहाण ठेवून आणि खासगी सावकारांकडून अव्वाच्या सव्वा दराने कर्ज घेऊन निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची आता चांगलीच कोंडी झाली आहे. निकालानंतर सत्तेचे स्वप्न भंगले असून, आता कर्जबाजारीपणामुळे पश्चात्ताप करण्याची वेळ या 'हौशी' नेत्यांवर आली आहे.

**जमिनी गेल्या, सोनेही गहाण; सत्तेची नशा उतरली!**

राजकारणात एकदा सत्तेची नशा चढली की माणूस परिणामांचा विचार करत नाही, याचा प्रत्यय या निवडणुकीत आला. जिल्हा परिषद सदस्य होण्यासाठी कुणी ५० लाख, तर कुणी २५ लाखांपर्यंतचा खर्च केला. हा पैसा उभा करण्यासाठी अनेक उमेदवारांनी आपल्या हक्काची एक-दोन एकर जमीन खासगी सावकारांच्या घशात घातली आहे. काही उमेदवारांनी घरातील दागिने तारण ठेवून निवडणूक लढवली. मात्र, आता निवडणुकीचा धुरळा शांत झाल्यावर सावकारांचे तगादे सुरू झाले असून, व्याजाचा डोंगर चढत चालल्याने या उमेदवारांची झोप उडाली आहे.

**जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या हौशी उमेदवारांना सावकारी पाशाचा विळखा! निवडणुकीत उडवले कोट्यवधी; आता व्याजाची परतफेड करताना डोळ्यांत पाणी**

**'कार्यकर्त्यांच्या' सल्ल्याने घात केला**

ग्रामीण भागात 'हौसे, नवसे आणि गौसे' कार्यकर्त्यांची कमतरता नाही. भाऊ, तुम्हीच निवडून येणार, तुमचीच हवा आहे, थोडा खर्च करा, मैदान मारू अशा चढ्या गप्पा मारणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आमिषाला उमेदवार बळी पडले. निवडणुकीत रंगीत-संगीत पार्ट्या, जेवणावळी आणि 'लक्ष्मी दर्शन' या प्रथा आता अनिवार्य झाल्या आहेत. या खर्चासाठी उमेदवारांनी सावकाराकडून टक्केवारीने पैसे उचलले. ज्या कार्यकर्त्यांनी खर्च करायला लावला, ते आता गायब झाले असून,



कर्जाचा भार मात्र एकट्या उमेदवाराच्या खांद्यावर आला आहे.

**अजब किस्सा: पत्नीला रिंगणात उतरवून जमीन विकली!**

या निवडणुकीत काही रंजक पण तितकेच धक्कादायक किस्से समोर येत आहेत. एका अतिउत्साही कार्यकर्त्याने आपल्या पत्नीला निवडणूक रिंगणात उतरवण्यासाठी स्वतःची जमीन करारावर देऊन लाखो रुपये उभे केले. विजयाची खात्री असल्याने त्याने पैसा पाण्यासारखा ओतला. मात्र, आता निवडणूक संपल्यानंतर हाती ना सत्ता आली, ना पैसा उरला. जमिनीवरचा ताबाही गेला आणि कर्जाचा डोंगर मात्र कायम आहे.

**खर्चाचा आकडा:** जिल्हा परिषदेसाठी १० ते ५० लाखांपर्यंत अनधिकृत खर्च,कर्जाचे स्वरूप: १० ते २० टक्के दराने खासगी सावकारांकडून उचल.**परिणाम:** अनेक इच्छुक उमेदवार आता शेतमजुरी किंवा कर्जबाजारीपणामुळे गाव सोडून जाण्याच्या मानसिकतेत. राजकारणातील ही चुरस केवळ विकासासाठी नसून ती वैयक्तिक प्रतिष्ठेची बनली आहे.

या प्रतिष्ठेपायी ग्रामीण भागातील मध्यमवर्गीय नेतृत्व आर्थिक विवंचनेत सापडले आहे. सत्तेची नशा आणि विजयाचा अतिआत्मविश्वास कसा घात करू शकतो, याचे जिवंत उदाहरण सध्या जिल्ह्याच्या ग्रामीण भागात चर्चेचा विषय ठरत आहे.

RTE **प्रवेशाचा बिगुल वाजला!**

## १७ फेब्रुवारीपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत (ठढए) २५ टक्के राखीव जागांसाठीची प्रवेश प्रक्रिया अखेर जाहीर झाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पालकांना १७ फेब्रुवारी ते १० मार्च २०२६ या कालावधीत ऑनलाईन अर्ज भरता येणार आहेत.शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी यासंदर्भात सुधारित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

अर्ज भरण्यास सुरुवात: १७ फेब्रुवारी २०२६

अर्जाची अंतिम मुदत: १० मार्च २०२६

अधिकृत संकेतस्थळ: https://student.maharashtra.gov.in/admšportal या प्रक्रियेअंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित आणि विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्व-प्राथमिक वर्गासाठी प्रवेश दिले जातात.

**वंचित घटक:** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती , भटक्या जमाती (B, C, D), OBC, SBC, एचआयव्ही बाधित, अनाथ, दिव्यांग आणि कोविड प्रभावित बालके.**दुर्बल घटक:** ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील बालके.

**शाळांची निवड:** पालकांना त्यांच्या घरापासून १ किमी अंतरावरील (हवाई अंतर) शाळांची यादी पोर्टलवर दिसेल. पालकांनी विचारपूर्वक जास्तीत जास्त १० शाळांची निवड करावी.**कागदपत्रे:** अर्ज करताना रहिवासी पुरावा, जन्माचा दाखला, उत्पन्नाचा दाखला (दुर्बल घटकांसाठी) आणि जात प्रमाणपत्र (वंचित घटकांसाठी) ही कागदपत्रे तयार ठेवणे आवश्यक आहे.**अचूक माहिती:** अर्ज भरताना कोणतीही चूक होणार नाही याची दक्षता घ्यावी, कारण चुकीच्या माहितीमुळे प्रवेश रद्द होऊ शकतो.पालकांना अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण किंवा समस्या आल्यास, आरटीई पोर्टलवर 'मदत केंद्रांची' (Help Centers) यादी देण्यात आली आहे. पालक त्यांच्या नजीकच्या केंद्रावर जाऊन तज्ज्ञांची मदत घेऊ शकतात.शेवटच्या क्षणी होणारी गर्दी टाळण्यासाठी पालकांनी मुदतीपूर्वीच आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## तहसिल कार्यालय पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

**पत्ता:** छत्रपती संभाजीनगर - पैठण मार्ग, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर दुरध्वनी क्र.: ०२४३१-२२३०५१

E-MAIL: tahsildarpathgmail.com

जा.क्र.: २०२५/दं.वि./जन्म मृ.नोंद/कावी

### जाहिर प्रकटन

**अर्जदार:** श्री. लक्ष्मण छगन जानकर, रा. पिंपळवाडी ता. पैठण, मो. ९४०४८५१८८२

**विषय: जन्म / मृत्यू सुधारणा अधिनियम २०२३ अन्वये अर्ज.**

ज्यानुसार जाहिर प्रकटनाद्वारे श्री. लक्ष्मण छगन जानकर (रा. पिंपळवाडी ता. पैठण, मो. ९४०४८५१८८२) यांनी विनंती अर्ज सादर करून कळविले आहे की, यांचा भाचा (शिवराज) यांचा जन्म पैठण येथील संदर्भ क्र. ०३ अन्वये रुग्णालयामध्ये दिनांक १८/०८/२०२५ रोजी झाला आहे.

त्याबाबतचे संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्याबाबतचे आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत उजर/आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह या न्यायालयात नोंदवावा.

मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर/आक्षेप/हरकत ग्राह्य धरले जाणार नाहीत व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रकटन माझ्या सही व शिक्क्यानिशी देण्यात आले.

**दिनांक:** १३/०२/२०२६

**स्थळ:** पैठण

**सही/-**

**तहसिलदार पैठण**

# छत्रपती संभाजी महाराज करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** फेब्रुवारी शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकणाऱ्या आणि नाट्यप्रेमींसाठी पर्वणी ठरलेल्या 'छत्रपती संभाजी महाराज करंडक' राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आज अत्यंत उत्साहात उद्घाटन झाले. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित ही स्पर्धा दि. १६ ते १८ फेब्रुवारी दरम्यान यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे रंगणार आहे.

नटराजाचे पूजन आणि दिपप्रज्वलन

कार्यक्रमाचे उद्घाटन महानगरपालिकेचे उपायुक्त तथा विभाग प्रमुख लखीचंद चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व नटराज पूजनाने करण्यात आले.

यावेळी बोलताना त्यांनी महापालिकेच्या वतीने कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी या स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले.याप्रसंगी व्यासपीठावर मान्यवरांची उपस्थिती लक्षणीय होती, ज्यात प्रामुख्याने **परीक्षक:** सिने-नाट्य अभिनेत्री शोभा दांडगे, प्रसिद्ध अभिनेता व दिग्दर्शक दत्ता जाधव, आणि डॉ. प्रेषित रुद्रवार प्रमुख उपस्थिती: ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. शेषराव पठाडे, सांस्कृतिक कार्य अधिकारी शंभू विश्वासू, विजय निकाळजे, सुनील जैस्वाल आणि हंसराज बन्सवाल.




'अम्मा' एकांकिकेने मारली बाजी

स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी सादरीकरणाचा दर्जा उंचावलेला पाहायला मिळाला. 'द ड्रामा टायझर' (सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर) या संस्थेने 'अम्मा' ही एकांकिका सादर केली. या एकांकिकेने आपल्या प्रभावी कथानकाने आणि कसदार अभिनयाने उपस्थित प्रेक्षकांसह परीक्षकांचीही मने जिंकली. पहिल्याच दिवशी मिळालेल्या या प्रतिसादामुळे स्पर्धेतील चुरस वाढली आहे.राज्यभरातून या स्पर्धेसाठी तब्बल २१ प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत. विविध सामाजिक, कौटुंबिक आणि ज्वलंत विषयांवर आधारित एकांकिका या तीन दिवसांत सादर होणार आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या रंगकर्मींनी या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद दिला असून, यामुळे शहराचे सांस्कृतिक वातावरण भारावून गेले आहे.विशेष टीप: ही स्पर्धा १८ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून, अंतिम दिवशी विजेत्यांचा गौरव केला जाणार आहे.

तरी जास्तीत जास्त रसिकांनी या नाट्य अविष्काराचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## राज्य शासनाचे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२५ जाहीर; १५ मार्च २०२६ पर्यंत प्रवेशिकांचे आवाहन




**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत दरवर्षीप्रमाणे दिला जाणारा 'राज्य उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' २०२५ वर्षासाठी जाहीर झाला आहे. यामध्ये उत्कृष्ट लेखन, दूरचित्रवाणी वृत्तकथा, छायाचित्रकार आणि समाज माध्यम अशा विविध श्रेणींचा समावेश असून, इच्छुकांना १५ मार्च २०२६ पर्यंत आपल्या प्रवेशिका सादर करता येतील.

या स्पर्धेसाठी १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तकथा किंवा छायाचित्रे ग्राह्य धरली जाणार आहेत.

या स्पर्धेअंतर्गत विविध गटांत पुरस्कार प्रदान केले जातात.उत्कृष्ट पत्रकारिता व लेखन: राज्य व जिल्हा स्तरावरील प्रभावी लेखन.

दूरचित्रवाणी वृत्तकथा (TV News): इलेक्ट्रॉनिक मीडियामधील उत्कृष्ट कामगिरी.

छायाचित्रकार (Photography): उत्कृष्ट आणि बोलकी छायाचित्रे.

समाज माध्यम (Social Media): डिजिटल माध्यमातील प्रभावी पत्रकारिता.

स्वच्छता अभियान जनजागृती: स्वच्छता अभियानाबाबत विशेष लेखन किंवा जनजागृतीपर कार्य.

इच्छुक स्पर्धकांना विहित नमुन्यातील अर्जासाठी खालीलप्रमाणे संपर्क साधता येईल.

जिल्हा स्तरावर: राज्यातील विविध भागांतील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून अर्ज प्राप्त करून घ्यावेत.

मुंबईसाठी: मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी 'माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२' येथून अर्ज घ्यावेत.

ऑनलाइन उपलब्ध: अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहेत.

महत्त्वाची टीप: प्रवेशिका पूर्ण भरून आवश्यक त्या पुराव्यांसह (कात्रणे/लिंक्स/व्हिडिओ) मुदतीच्या आत सादर करणे अनिवार्य आहे.

# वेरूळ नगरीत कबीर पंथीयांचा भक्तिमय जागर; महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरूळ नगरीत महाशिवरात्रीचे औचित्य साधून कबीर पंथाच्या वतीने भव्य कीर्तन, भजन आणि सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महंत पोपटदास महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि. १५) रात्री पार पडलेल्या या कार्यक्रमाने संपूर्ण वेरूळ परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

रात्रभर रंगली भजनाची मैफल

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या समीप असलेल्या परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही कबीर पंथीय भक्तांचा मेळावा भरला होता. 'साधु आणि संत' यांच्या विचारांचा वारसा जपत, या ठिकाणी रात्रभर भजनाची मैफल रंगली होती.



राज्यभरातून आलेल्या भक्तांनी एकापेक्षा एक सरस भजने सादर करत महाशिवरात्रीचा जागर केला. कबीर महाराजांच्या सुश्राव्य कीर्तनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विशेष म्हणजे, या सोहळ्यात वारकरी संप्रदायातील भाविकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावून सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडवले.

विविध समाजांच्या मठांमध्ये धार्मिक कार्यक्रमांची सांगता

वेरूळ येथील महाशिवरात्रीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे विविध समाजांचे ऐतिहासिक मठ आहेत. यामध्ये प्रामुख्याने वीरशैव लिंगायत मठ,वीरशैव कक्कय्या मठ,धोबी परीट समाज मठ,चर्मकार समाज मठ या सर्व मठांमध्ये महाशिवरात्रीच्या आठवडाभर आधीपासूनच सप्ताह आणि विविध धार्मिक विधींचे आयोजन केले जाते. आध्यात्मिक प्रबोधन आणि भक्तीचा अनोखा संगम या कार्यक्रमांमधून पाहायला मिळतो. महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी 'महाप्रसादाने' या सर्व कार्यक्रमांची सांगता करण्यात येते.

या उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रातून विविध समाजाचे भाविक वेरूळमध्ये एकत्र येतात. केवळ धार्मिक विधीच नव्हे, तर एकमेकांना भेटणे आणि विचारांची देवाणघेवाण करणे यामुळे या सोहळ्याला 'स्नेहमिलनाचे' स्वरूप प्राप्त होते. दर्शनानंतर आणि रात्रभराच्या जागरानंतर सर्व भाविक तृप्त भावनेने आपापल्या गावी मार्गस्थ होतात.

कबीर पंथाची ही परंपरा आम्ही अनेक वर्षांपासून जोपासत आहोत. भक्ती आणि अध्यात्माच्या माध्यमातून समाज प्रबोधन व्हावे, हाच यामागचा मुख्य उद्देश आहे.

**- महंत पोपटदास महाराज, वेरूळ.**

## शिवजयंती निमित्त जालन्यात १८ व १९ फेब्रुवारीला सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी; जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच ढक्सप्रेस**


**जालना (प्रतिनिधी)** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १८ आणि १९ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या या कार्यक्रमांतून शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला जाणार आहे.

हे सर्व कार्यक्रम जालना येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (टाऊन हॉल) येथे आयोजित करण्यात आले असून, दोन्ही दिवशी सकाळी ११:०० वाजता कार्यक्रमांची सुरुवात होईल.

शिवरायांचे कार्य, कर्तृत्व आणि शौर्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी दोन विशेष शाहिरी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६: शाहिर अजिंक्य लिंगायत यांचा 'जागर शिवशाहीचा' हा कार्यक्रम सादर होईल. पोवाडे आणि शाहिरीतून शिवरायांच्या जीवनातील महत्त्वाचे टप्पे यावेळी मांडले जातील.गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६: शाहिर रामानंद उगले आणि माधवी उगले-माळी यांचा 'शाहिरी शिवदर्शन' हा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होईल. या माध्यमातून शिवरायांच्या पराक्रमाची गाथा संगीतमय पद्धतीने सादर केली जाईल.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने आयोजित करण्यात आलेले हे कार्यक्रम सर्वांसाठी खुले आहेत. जालन्यातील नागरिक, विद्यार्थी आणि शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# थरार! वडीगोद्रीत स्टेट बँक फोडण्याचा मध्यरात्री धाडसी प्रयत्न; गॅस कटरसह घुसले ५ दरोडेखोर!



**आत्ताच एक्सप्रेस**

**वडीगोद्री (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यातील वडीगोद्री येथे धुळे-सोलापूर महामार्गावर असलेल्या भारतीय स्टेट बँकेच्या (SBI) शाखेवर शनिवारी मध्यरात्री दरोडेखोरांनी सशस्त्र हल्ला चढवला. गॅस कटर आणि आधुनिक साहित्यासह आलेल्या ५ चोरट्यांनी बँकेचे शटर तोडून आत प्रवेश केला. मात्र, नशिबाची साथ आणि तिजोरीचा भक्कमपणा यामुळे कोट्यवधींची रोकड वाचली असून एक मोठा अनर्थ टळला आहे.

नियोजनबद्ध कट; सीसीटीव्ही निकामी करण्याचा प्रयत्न

मिळालेल्या माहितीनुसार, हे दरोडेखोर पूर्ण तयारीनिशी आले होते. ओळख पटू नये म्हणून त्यांनी तोंडाला रुमाल बांधले होते, तर दोघांनी चक्क बुरखा परिधान केला होता.

बँकेत शिरल्यानंतर सर्वात आधी त्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर रुमाल बांधून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, चोरट्यांचा हा डाव फसला असून, बँकेतील आणि शेजारील ज्ञानगंगा इंग्लिश स्कूलच्या कॅमेऱ्यांमध्ये या पाचही जणांच्या हालचाली कैद झाल्या आहेत.

**शेतात सापडले 'डेथ वॉरंट'; गॅस कटरने तिजोरी फोडण्याचा होता डाव**

रविवारी सकाळी ११ च्या सुमारास हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. घटनेची व्याप्ती किती मोठी होती, हे तेव्हा समजले जेव्हा पोलिसांनी परिसराचा पंचनामा केला. बँकेच्या जवळच असलेल्या एका शेतात चोरट्यांनी टाकून दिलेला:

एक मोठा गॅस सिलिंडर

**एक छोटी गॅस टाकी साहित्याची बॅग**

हे साहित्य जप्त करण्यात आले आहे. यावरून हे स्पष्ट होते की, चोरटे गॅस कटरच्या साहाय्याने लोखंडी तिजोरी कापून मोठी लूट करण्याच्या तयारीत होते.

**पोलिस यंत्रणा सतर्क; तपासाचे चक्र वेगाने**

या घटनेने वडीगोद्री परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. महामार्गालगत असलेल्या बँकेत असा धाडसी प्रकार घडल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे सावट आहे. घटनेची माहिती मिळताच गोंदी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि पोलीस पाटलांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. चोरट्यांनी शटर तोडून आत प्रवेश मिळवला खरा, पण तिजोरीपर्यंत पोहोचण्यात किंवा ती फोडण्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे बँकेतील सर्व रोकड सुरक्षित असल्याचे बँक प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**बुरखाधारी चोरटे कोण? सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून कसून तपास सुरू.**

महामार्गावरील गस्त: सोलापूर-धुळे हायवेवर रात्रीची पोलीस गस्त वाढवण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**टोळीचा छडा:** गॅस कटरचा वापर पाहता ही एखादी आंतरराज्य किंवा सराईत गुन्हेगारांची टोळी असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास गोंदी पोलीस करत असून, लवकरच या टोळीच्या मुसक्या आवळल्या जातील, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

रिपोर्ट: गणेश सपकाळ
जालना जिल्हा प्रतिनिधी.

महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
समता न्याय एकात्मता

**कार्यालयाचे नांव :- सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना**
**पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जालना**

ई-मेल :- acswojalnagmail.com दुरध्वनी क्रमांक :- ०२४८२-२२५१७२

### निविदा सुचना

सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना या कार्यालयाच्या अखत्यारीतील शासकीय वसतिगृहासाठी साहित्य पुरवठा करण्यासाठी नामांकित व अनुभवी संस्था यांच्याकडून शासनाच्या ई-निविदा पोर्टलवर निविदा पद्धतीने स्पर्धात्मक दर मागविण्यात येत आहे. खरेदी करावयाच्या वस्तू व निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | निविदा सुचना क्र | कामाचा तपशिल | अंदाजित किंमत रु |
|---|---|---|---|
| ०१ | १/२०२५-२६ | शासकीय वसतिगृह सोयी सुविधा साहित्य पुरवठा | ३२,५८,३०३/- |

१. निविदा विक्री दिनांक १२.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०६:०० वाजेपासून सुरु होत असून, निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांक २५.०२.२०२६ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक निविदाकार यांनी वेबसाईट https://mahatenders.gov.in(https://mahatenders.gov.in) या संकेत स्थळावर संपर्क साधावा.

२. सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी निवेदेतील बाबींची संख्या कमी/अधिक करण्याचे आणि कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचे अधिकार स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

३. ई-निविदा उघडण्याचा दिनांक २६.०२.२०२६ राहील.

४. ई-निविदा बाबतच्या मदतीसाठी / माहितीसाठी कृपया पुढील नमूद केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. संपर्क क्र. ०२४८२-२२५१७२.

(टिप:- निविदा मागणी संदर्भात कोणतेही शुध्दीपत्रक / दुरुस्ती असल्यास ती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.)

**दिनांक** :- १२.०२.२०२६.
**ठिकाण** :- जालना.

**(स्वाक्षरी)**
**(स्नेहल मोदाळे)**
**विशेष अधिकारी (शानिशा)**
**सहायक आयुक्त,**
**समाजकल्याण, जालना**

जा.क्र.जिमाका/जालना/७३/२०२५-२६

# जालन्याच्या विकासाचा 'पुणे' पॅटर्न: ४९ नगरसेवकांनी गिरवले 'यशदा'त प्रशिक्षणाचे धडे!

**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा मास्टरस्ट्रोक; 'प्रशासकीय शिस्त' आणि 'तांत्रिक माहिती'ने सज्ज झाली जालन्याची पहिली महानगरपालिका.**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / विशेष प्रतिनिधी**/जालना शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच अस्तित्वात आलेल्या महानगरपालिकेच्या कारभाराला आता खऱ्या अर्थाने गती मिळणार आहे.

केवळ निवडणुका जिंकून भागणार नाही, तर शहराचा विकास हा तांत्रिक आणि कायदेशीर चौकटीत राहूनच करावा लागेल, हा कडक संदेश जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल यांनी नवनिर्वाचित सदस्यांना दिला आहे. त्यांच्याच पुढाकाराने पुण्याच्या 'यशदा' (YASHAD-) या नामांकित संस्थेत ४९ नगरसेवकांचे दोन दिवसीय 'पायाभूत प्रशिक्षण' नुकतेच दिमाखात संपन्न झाले.

**प्रशासकीय 'लर्निंग कर्व': खुर्चीची ताकद आणि कायद्याची चौकट!**

दिनांक १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या प्रशिक्षणात जालन्यातील लोकप्रतिनिधींनी आक्रमकपणे सहभाग नोंदवला. निवडून आल्यानंतर अनेकांना महापालिकेच्या 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९' मधील तरतुदींची माहिती नसते. हीच उणीव भरून काढण्यासाठी आयुक्तांनी थेट 'यशदा' गाठण्याचे नियोजन केले.

लोकप्रतिनिधी विरुद्ध प्रशासन: वादापेक्षा संवादातून शहराचा विकास कसा साधायचा, याचे धडे देण्यात आले.पुणे मॉडेलचा अभ्यास: कचरा व्यवस्थापनात पुण्याच्या 'स्वच्छ' मॉडेलचा वापर जालन्यात कसा करता येईल, यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

**दोन दिवसांचा 'पावर-पॅक्ड' अजेंडा**

**दिवस १:**

**व्हिजन आणि मॉडर्न टेक्नॉलॉजी**

पहिल्या दिवशी सदस्यांना केवळ राजकारण नाही, तर 'शाश्वत विकास' म्हणजे काय, हे समजावून सांगण्यात आले. आयटी (IT) चा वापर करून भ्रष्टाचाराला लगाम कसा लावायचा आणि पारदर्शकता कशी आणायची, यावर विशेष भर देण्यात आला. तसेच, एका यशस्वी लोकप्रतिनिधीचे व्यक्तिमत्व कसे असावे आणि 'मनाची शक्ती' विकासकामात कशी वापरावी, यावर प्रेरक सत्रे पार पडली.

**दिवस २:**

**कायद्याचा बडगा आणि तिजोरीच्या चाव्या**

दुसऱ्या दिवशीचे सत्र अत्यंत तांत्रिक आणि महत्त्वाचे होते. यामध्ये खालील विषयांवर नगरसेवकांना अक्षरशः घाम फोडणारे मार्गदर्शन मिळाले.नगररचना (Town Planning): बेकायदेशीर बांधकामांना पायबंद आणि शहराचा सुनियोजित आराखडा,महसूल वाढ: कर संकलन आणि मालमत्ता कराचे महत्त्व.



**फेरीवाला धोरण:** २०१४ च्या अधिनियमानुसार शहराला 'फेरीवाला मुक्त' आणि 'फेरीवाला सुसह्य' कसे बनवायचे, याची सविस्तर माहिती देण्यात आली.

**आता प्रश्न सुटणार, केवळ घोषणा होणार नाहीत!**

या प्रशिक्षणामुळे जालन्यातील नगरसेवकांना आता केवळ 'राजकीय आश्वासने' देऊन चालणार नाही, तर त्यांना तांत्रिक फाईल कशी वाचायची, निधी कसा खेचून आणायचा आणि स्थायी समितीचे महत्त्व काय असते, हे उमजले आहे. महापालिका सचिव सुप्रिया चव्हाण आणि केशव कानपुडे यांच्या उपस्थितीत सदस्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

जालना महापालिकेची ही पहिलीच बॅच असल्याने, 'यशदा'मधील हे प्रशिक्षण शहराच्या भविष्यासाठी 'टर्निंग पॉईंट' ठरणार आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या या दूरदृष्टीचे सर्वत्र कौतुक होत असून, आता हे ४९ 'प्रशिक्षित' शिलेदार जालन्याचा कायापालट करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

## जालन्यात विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला!

**सेंट मेरी हायस्कूलजवळील 'त्या' पुलावरून प्रशासनाला कायदेशीर नोटीस**



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/शहरातील देऊळगाव राजा रोडवरील सेंट मेरी हायस्कूल परिसरातील एक असुरक्षित पूल सध्या विद्यार्थ्यांसाठी 'मृत्यूचा सापळा' ठरत आहे. या पुलाला संरक्षक कठडे किंवा भिंत नसल्याने शेकडो विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला असून, या गंभीर प्रकरणी ड. महेश एस. धानवत यांनी जालना महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे.

सेंट मेरी हायस्कूलमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांना दररोज या पुलाचा वापर करावा लागतो. मात्र, पुलाला दोन्ही बाजूंनी संरक्षक भिंत नसल्याने, शाळे सुटण्याच्या वेळी होणाऱ्या गर्दीत विद्यार्थ्यांचा तोल जाऊन ओढ्यात पडण्याची दाट शक्यता आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे व्हावे, यासाठी ही नोटीस धाडण्यात आली आहे.धानवत यांनी आपल्या नोटिसीमध्ये प्रशासनाच्या निष्काळजीपणावर कडक ओढले ओढले आहेत.जगण्याचा हक्क (कलम २१): भारतीय संविधानानुसार प्रत्येक मुलाला सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार आहे. असुरक्षित पुलामुळे या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन होत आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४९: रस्ते आणि पुलांची देखभाल करणे हे पालिकेचे वैधानिक कर्तव्य आहे. कलम ६६ नुसार सार्वजनिक सुरक्षा सुनिश्चित करणे बंधनकारक आहे.

# दहा वर्षांनंतर जुळले मैत्रीचे बंध; आहेर बोरगाव येथे २०१५-१६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**सेलू (आहेर बोरगाव)प्रतिनिधी/ गणेश सपकाळ**/ काळाच्या ओघात विखुरलेले मित्र जेव्हा तब्बल १० वर्षांनंतर पुन्हा एकत्र येतात, तेव्हा तो क्षण केवळ आनंदाचाच नाही तर आठवणींचा अनमोल ठेवा ठरतो. सेलू तालुक्यातील नितीन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आहेर बोरगाव येथील सन २०१५-१६ च्या दहावीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. प्रदीर्घ कालावधीनंतर एकमेकांना भेटल्याने सर्वच विद्यार्थी भावूक झाले होते.

**आठवणींना उजाळा आणि गप्पांची मैफल**

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील गमतीजमती, शिक्षकांचा धाक आणि मैत्रीचे किस्से सांगून जुन्या आठवणींना उजाळा दिला. 'दहावी' हे आयुष्यातील महत्त्वाचे वळण होते, असे सांगताना अनेकांचे डोळे पाणावले होते. शाळेच्या आवारात पुन्हा एकदा तोच कलकलाट आणि हास्यविनोद पाहायला मिळाला.

**विविध क्षेत्रांत उमटविली यशाची मोहोर**

दहा वर्षांपूर्वी शाळेतून बाहेर पडलेले हे विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. कोणी अभियंता, कोणी डॉक्टर, तर कोणी यशस्वी उद्योजक म्हणून समाजात नाव कमवत आहे. या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या प्रगतीचा आढावा मित्रांसमोर मांडला. एकमेकांच्या यशामध्ये सहभागी होत सर्वांनी आनंद व्यक्त केला. शाळा सुटली तरी मैत्री सुटत नाही, हे आज या मेळाव्याने सिद्ध केले, अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.




**शाळेप्रती कृतज्ञता: ११ हजारांची देणगी सुपूर्द**

आपण ज्या शाळेत शिकलो, त्या शाळेचे आपण काहीतरी देणे लागतो, या उदात्त हेतूने सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत शाळेसाठी ११ हजार रुपयांची देणगी मुख्याध्यापकांकडे सुपूर्द केली. माजी विद्यार्थी प्रतिनिधी पांडुरंग शिंदे यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

गुरुजनांचा सन्मान आणि आशीर्वाद

ज्या शिक्षकांनी या विद्यार्थ्यांना घडवले, त्या शिक्षकांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी:

मुख्याध्यापक: सर्जेराव लहाने,उपमुख्याध्यापक: गंगाधर आवचार, शिक्षकवृंद: पांडुरंग लाडाने, आबासाहेब बिडवे, सुरेंद्र दिसागत, विष्णू आंधळे, राजाभाऊ चव्हाण, संतोष ताल्डे, कैलास चोकनपळे, भगवान पवार, श्रीमती आहेरकर आपल्या लाडक्या विद्यार्थ्यांना प्रगती पथावर पाहून शिक्षकांनीही समाधान व्यक्त केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस आशीर्वाद दिले.

स्नेहभोजन आणि सेल्फीचा आनंद

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. दहा वर्षांनंतरचा हा दुर्मिळ क्षण कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सेल्फी आणि ग्रुप फोटो काढले.या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कृष्णा लिपने, संतोष लिपणे, परमेश्वर लिपणे, दिनेश चव्हाण, राजेश खरात, पुरुषोत्तम हरके, दिगंबर भुंबर, राजेश लहाने, सचिन लहाने, पांडुरंग शिंदे, महेश लहाने, माऊली खंदारे, प्रकाश वाघमारे, काळे करण, दीपक दुधाटे, सत्यम येरगे, कृष्णा लहाने तसेच माजी विद्यार्थिनी वैष्णवी गटकळ, पूजा गोरे, आयोध्या ताठे, शामभाला कराळे, माधुरी लहाने, संगीता लिपणे, भाग्यश्री काकडे यांसह अनेक मित्र-मैत्रिणींनी परिश्रम घेतले.

# जालना: मोती तलाव येथे जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव प्रशिक्षण संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना(प्रतिनिधी)** जिल्ह्यात उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्तींना तोंड देण्यासाठी प्रशासन आता अधिक सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष आशिमा मित्तल आणि निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली आज जालना शहरातील मोती तलाव येथील विसर्जन कुंड परिसरात जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव साहित्य हाताळणी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला.प्रशिक्षणाचा उद्देश आणि सहभागजिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत आयोजित या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश पूर, जलदुर्घटना आणि इतर आपत्कालीन परिस्थितीत त्वरित व सुरक्षित बचावकार्य करणे हा होता. या प्रशिक्षणात जिल्ह्यातील महानगरपालिका, सर्व नगर परिषद, नगर पंचायत अग्निशमन विभाग आणि होमगार्ड्स दलातील कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. आपत्कालीन परिस्थितीत अत्याधुनिक साहित्याचा प्रभावी वापर कसा करावा, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक यावेळी देण्यात आले.अत्याधुनिक साहित्याची खरेदी आणि वितरणजिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणात नवीन



व आधुनिक साहित्याची खरेदी केली आहे. हे साहित्य आता जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अग्निशमन विभागांकडे सोपवण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील साहित्याचा समावेश आहे.

साहित्याचे नावसंख्यासाहित्याचे नावसंख्यालाईफ जॅकेट २२५ लाईफबोये १०० रिफ्लेक्टर जॅकेट २२५ फ्लोटींग पंप १० फायर जेल ब्लँकेट २० पोर्टेबल पंप १० मेगाफोन २० बॅटरी कटर ९ सेफ्टी नेट १० बॅटरी स्प्रेडर ९फायबर बोट४रबर बोट३पोर्टेबल जनरेटर४स्कुबा सेट२मान्यवरांची उपस्थितीया कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल होत्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर, आणि जालना मनपाचे प्रभारी अग्निशमन अधिकारी संदीप दराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यासोबतच भोकरदन, परतूर, अंबड, बदनापूर, जाफ्राबाद, मंठा, घनसावंगी आणि तीर्थपुरी येथील अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षणामुळे जिल्ह्याची बचाव यंत्रणा अधिक सक्षम झाली असून, भविष्यातील संकटांना तोंड देणे सुलभ होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813